०७।६


# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४००० ०२१.

दूरध्वनी : ०२२-२२०४४९५२/२२०४५७०६ फॅक्सः २२८८६६६६

ई-मेलः clmms@yahoo.in; dclmms@yahoo.in ;

dclmms_complaints@yahoo.com


क्र. वैमाशा-९/परिपत्रक/परवाना/नुतनी क./२०१४/७२०८ दिनांक१३ नोव्हेंबर, २०१४

## परिपत्रक

विषयः- वैध मापन शास्त्र अधिनियम २००९ व महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११. परवान्याच्या नुतनीकरणाबाबत.

उपरोक्त अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार वैध मापन शास्त्र अधिका-यांचे वजन माप विषयक परवाने दिले जातात व त्यांचे नुतनीकरण केले जाते. सदर नुतनीकरणाच्या वेळेस अर्जदारांकडून उपरोक्त अधिनियम व नियमातील तसेच अन्य अनुषांगिक बाबींचे पालन होणे आवश्यक आहे. या संदर्भात नुतनीकरण करताना पुढील बाबींचा विचार करुन परवान्याचे नुतनीकरण करावे.

१) परवाना धारकांच्या संदर्भात या कार्यालयाने विहित केलेली तांत्रिक अर्हता चाचणी घेऊन सदर चाचणी यशस्वी रित्या पुर्ण करणा-या परवाना धारकास पुर्ण करणे आवश्यक आहे.

२) परवाना धारकाकडे परवान्याशी संबंधीत जागेच्या संबंधातील दुकाने व संस्था अधिनियमांतर्गत विहित कालग्राह्य परवाना असावा.

३) परवाना धारकास लागू असल्यास आयकर विवरण पत्र भरलेले असावे.

४) परवाना धारकाकडे लागू असल्यास त्याच्या कर्मचा-याच्या संदर्भातील वेतनपट वा कामगार विमा योजनेअंतर्गत नोंदणी असावी. परवाना धारकावर कोणत्याही गुन्हाची नोंद नसावी व त्याला कोणत्याही गुन्हाखाली अटक झालेली नसावी. या बाबत पोलीसांचे चारित्र्य प्रमाणपत्र.

५) एका पत्त्यावर एका पेक्षा अधिक परवाने नसावेत.

६) परवाना धारकांनी मागील वर्षात केलेले कामकाज विचारात घेऊन त्याचे कामकाजाचे कार्यक्षेत्र मर्यादीत असावे.

वरील सुचना या उपरोक्त अधिनियम व नियमातील अन्य तरतुदीप्रमाणेच लागू राहतील या बाबतची खातरजमा नुतनीकरण करणा-या अधिका-याची राहिल. याशिवाय परवान्यांचे नुतनीकरण झाल्यानंतर त्यापुढील महिन्यात नुतनीकरण करणा-या प्राधिका-याने वरील बाबींची खातरजमा केल्यानंतर परवाने दिल्याबाबतचे प्रमाणित करुन या कार्यालयास त्वरीत पाठवावे.

१३।११

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व उप नियंत्रक वैध मापन शास्त्र.

२) सर्व सहायक नियंत्रक वैध मापन शास्त्र.

# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

शासकीय कुटीर क्र.७, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई – ४०० ०२१.

दुरध्वनी क्र. :- ०२२-२२०४३३५४/२२०४५७०६ फॅक्स क्र.०२२ – २२८८६६६६

Email Add :- dclmms@yahoo.in / dclmms complaints@yahoo.com

क्र.वैमाशा- /कॉम्पो.प्रीसेट.ॲड.सील/२०१५/ दि. जानेवारी, २०१५

----

विषय:- वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११.

प्रत्येक तोलन उपकरण वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११ च्या नियम १३ खालील परिशिष्ठ-७ चे परिच्छेद 4(1)(ii)(d) मधील तरतुदीनुसार असणे आवश्यक आहे आणि सदर परिशिष्ठाच्या परिच्छेद 4(1)(ii)(e) मध्ये उपकरणाचे components, pre-set controls आणि adjustment वर सील लावण्याबाबतच्या तरतुदी विहीत करण्यात आलेल्या आहेत. एकंदरीत पडताळणीच्या वेळेस वैध मापन शास्त्र अधिका-यांना हे components आणि adjustment सील करणे आवश्यक ठरते.

मात्र सदर components, pre-set controls आणि adjustment हे प्रत्येक उत्पादकाचे भिन्न असल्यामुळे याबाबत वैध मापन शास्त्र अधिका-यांना माहिती असणे आवश्यक आहे.

यास्तव आपण उत्पादीत केलेल्या उपकरणातील components, pre-set controls आणि adjustment चे रेखाचित्र (schematic diagram)आणि लिखीत स्वरुपातील माहिती या कार्यालयास ी सादर करावी.

(संजय पाण्डेय)
नियंत्रक,
वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य,मुंबई